सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण संचालनालय

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**

**बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**महत्वाचे /तात्काळ**

जा. क्र. :तंशिविकापु/तासिका तत्व नियुक्ती/२०२४-२५/ 2740

दिनांक : 0 9 JUL 2024

# परिपत्रक

प्रति,

प्राचार्य,

या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था

**विषय :** तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्तीबाबत...

**संदर्भ :** १.शासन पत्र क्र.न्यायाप्र-२८२३/प्र.क्र.२३/तांशि-७,दि.२९/०१/२०२३

२.संचालनालयाचे पत्र क्र.४ अ/आस्था-१/तासिका तत्वावर नियुक्ती/२०२४/३३, दि.३०/०१/२०२४

३. संचालनालयाचे पत्र क्र.४ अ/आस्था-२/तासिका तत्वावर /२०२४/२७७, दि.०९/०७/२०२४

शासकीय तंत्रनिकेतनात तासिका तत्वावर करण्यांत येणा-या नेमणूकांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३९१/२०२३ दाखल करण्यांत आलेली आहे. सदर रिट याचिकेत मा.न्यायालयाने दि.१०/०८/२०२३ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारीत केलेले आहे.

Stand over **22/08/2023 till that date the order of appointment pursuant to the interview held shall not be issued**

मा. उच्च न्यायालयाने दिलेले उक्त आदेश vacate करण्याकरिता सिविल ॲप्लिकेशन सादर करण्यास शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला असता शासनाने तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्त्यांच्या संदर्भात स्वयंस्पष्ट धोरण निश्चित करण्याबाबत सुचित केलेले आहे. तसेच सदर धोरण निश्चित होईपर्यन्त एखाद्या संस्थेस तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्त्या करण्यास निकड भासल्यास नियुक्त्यापूर्वी संचालनालयाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे असे कळविले होते.त्यास अनुसरून संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये अधिनस्त शासकीय संस्थामध्ये तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्त्या करू नये असे कळविण्यांत आले होते.

संदर्भ क्र. १ च्या शासन पत्रातील परिच्छेद २(३) विचारात घेऊन या विभागाच्या अधिनस्त सर्व शासकीय तंत्रशिक्षण संस्थांच्या संस्था प्रमुखांना सूचित करण्यांत येते की, संदर्भ क्र. ३ अन्वये या परिपत्रकासोबत जोडलेल्या तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्तीबाबतच्या अटी व कार्यपध्दतीचे अवलोकन करून त्यानुसार कार्यवाही करावी. व आपले संस्थेतील तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्तीबाबतच्या प्रस्ताव या विभागीय कार्यालयांस सादर करावेत.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ.द.व्यं.जाधव)

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पूणे

प्रत - १. प्रोग्रॅमर तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

E:\जाधव म.भा\u.B.Jadhav letter\परिपत्रक २०२४.docx

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी क्र. ०२२-68597473/424/434,
ई-मेल–desk4a@dtemaharashtra.gov.in.वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in


क्र.४अ/आस्था-२/तासिका तत्वावर/२०२४/२७७ दिनांक : - 9 JUL 2024

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे.

विषय : तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्तीबाबत....
संदर्भ : ०१. शासन पत्र क्रमांक न्यायाप्र-२८२३/प्र.क्र.२३/२०२३/तांशि-७, दि.२९/०१/२०२३
०२.संचालनालयाचे पत्र क्रमांक ४अ/आस्था-१/तासिका तत्वावर नियुक्ती/२०२४/३३, दि.३०/०१/२०२४

शासकीय तंत्रनिकेतनात तासिका तत्वावर करण्यात येणाऱ्या नेमणूकांच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्रमांक ३९१/२०२३ दाखल करण्यात आलेली आहे. सदर रिट याचिकेत मा.न्यायालयाने दि.१०/०८/२०२३ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केलेले आहे.

**Stand over 22/08/2023 till that date the order of appointment pursuant to the interviews held shall not be issued.**

मा. उच्च न्यायालयाने दिलेले उक्त आदेश Vacate करण्याकरिता सिविल ॲप्लीकेशन सादर करण्यास शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला असता शासनाने तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्त्यांच्या संदर्भात स्वयंस्पष्ट धोरण निश्चित करण्याबाबत सुचित केलेले आहे. तसेच सदर धोरण निश्चित होईपर्यंत एखाद्या संस्थेस तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्त्या करण्यास निकड भासल्यास नियुक्त्यांपूर्वी संचालनालयाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे असे कळविले होते. त्यास अनुसरुन संदर्भ क्रमांक ०२ च्या पत्रान्वये आपल्या अधिनस्त शासकीय संस्थामध्ये तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्त्या करु नये असे कळविण्यात आले होते.

संदर्भ क्रमांक ०१ च्या शासन पत्रातील परिच्छेद २(३) विचारात घेऊन आपल्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतनातील तासिका तत्वावर अध्यापकांच्या नियुक्त्यांबाबत संस्थांच्या प्रस्तावांची काटेकोर पडताळणी करुन सोबत जोडलेल्या अटी व कार्यपद्धतीच्या आधारे आपल्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरिता सादर.

परिशिष्ट

**अ) तासिका तत्वावरील अभ्यागत अध्यापकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यासंदर्भात निकष व अटी :**

I. तासिका तत्वावरील अध्यापकांच्या सेवा एका शैक्षणिक वर्षासाठी, कमाल ९ महिन्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात घेता येतील. सदर कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर सेवा आपोआप संपुष्टात येतील.

II. निव्वळ तासिका तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात अभ्यागत अध्यापकांच्या सेवा घेण्यात याव्यात. सदरील सेवा तात्पुरत्या स्वरूपातील असून त्यामुळे नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.यास्तव "भविष्यात सेवेत कायम करण्याचे मागणी करणार नाही.तसेच नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी करणार नाही" तसेच आदेशातील अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र संबंधित अभ्यागत अध्यापकाकडून घेण्यात यावे.

III. अभ्यागत अध्यापकांनी शिकवलेल्या विषयाच्या घटक चाचणी संबंधित सेवा ही बाब अभ्यागत अध्यापक म्हणून सेवेचा भाग असेल.

**ब) अभ्यागत अध्यापकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यपध्दती :**

निव्वळ तासिका तत्वावर अभ्यागत अध्यापक म्हणून सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठीची निवड करतांना खालील प्रमाणे कार्यपद्धती राबविण्यात यावी.

I. पदवी व पदविका संस्थेतील अभ्यागत अध्यापकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याबाबतची निवड प्रक्रिया संबंधित संस्थेच्या स्तरावर पारदर्शकपणे राबविण्यात यावी.

II. प्रमाणित शैक्षणिक भाराच्या किमान १० % शैक्षणिक कार्यभाराचा वाटप नियमित अध्यापकांना केल्यानंतर उर्वरित शैक्षणिक कार्यभार अभ्यागत अध्यापकांना देण्याबाबत गृहीत धरावा.

III. पदवी व पदविका संस्थांनी विभागीय कार्यालयाकडे संस्थेतील विद्यार्थी शिक्षक प्रमाणाच्या अनुषंगाने व प्रमाणित शैक्षणिक भारानुसार केलेल्या, आवश्यक असलेल्या अभ्यागत अध्यापकांची सेवा उपलब्ध करुन घेण्याकरीता संबंधित विभागीय कार्यालयाच्या मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करावा.

IV. विभागीय कार्यालयाने दिलेल्या मान्यतेनुसार संस्थास्तरावर थेट मुलाखतीच्या अनुषंगाने जाहिरात प्रसिद्ध करण्यात यावी, जिल्ह्यातील प्रमुख वर्तमानपत्रात आणि संबंधित विभागीय कार्यालयाच्या आणि संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध / उपलब्ध करावी.

V. तासिका तत्वावरील अध्यापकांच्या निवड प्रकियेकरीता संस्थास्तरावर निवड समिती गठीत करण्यात यावी. सदर निवड प्रक्रियेचा संस्थास्तरावर कालबद्ध कार्यक्रम राबवून कार्यवाही करावी.

VI. प्रत्यक्ष उपस्थित उमेदवारांची संख्या शैक्षणिक कार्यभारासाठी आवश्यक अभ्यागत अध्यापकांपेक्षा जास्त असल्यास उमेदवारांची चाळणी परिक्षा आयोजित करण्यात यावी. सदर चाळणी परिक्षेतून सादरीकरण व मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची यादी घोषित करण्यात यावी.

VII. सर्व उमेदवारांच्या सादरीकरण व मुलाखती पार पडल्यानंतर तात्काळ उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करुन प्रसिध्द करण्यात यावी.

VIII. सदर गुणवत्ता यादी एका शैक्षणिक सत्र / वर्षाकरीता वैध राहिल, व आवश्यकतेनुसार पात्र उमेदवारांच्या सेवा घेण्यात याव्यात.

IX. उपरोक्त प्रमाणे निवड प्रक्रिया विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन पार पाडावी.

X. शिखर परिषद (AICTE/PCI/COA, etc.) मानकांनुसार शासकीय पदवी पदविका संस्थामध्ये मंजूर असलेल्या पदांच्या व त्यामधील रिक्त असलेल्या पदांच्या मर्यादेत / शैक्षणिक कार्यभारानुसार तासिका तत्वावरील अभ्यागत अध्यापकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

XI. ज्या संस्थेत अभ्यासक्रम मंजूर आहे, तथापि पदे मंजूर नाहीत त्या संस्थेत प्रवेश क्षमतेच्या / विद्यार्थी-शिक्षक प्रमाणात / शैक्षणिक भारानुसार अध्यापकांची संख्या निश्चित करावी.

XII. अभ्यागत अध्यापक म्हणुन सेवा घेण्यात येणाऱ्या उमेदवारांकडून हमीपत्र घेण्यात यावे (प्रपत्र - इ).

XIII. निवड समितीने अभ्यागत अध्यापक म्हणून निव्वळ तासिका तत्वावर सेवा घेण्यासाठी शिफारस केलेल्या अभ्यागत अध्यापकांचे आदेश संस्थास्तरावर निर्गमित करण्यात यावेत. सदर आदेशाची प्रत विभागीय कार्यालयास माहितीसाठी सादर करण्यात यावी. या आदेशामध्ये सदरील नियुक्ती निव्वळ तासिका तत्वावरील व तात्पुरत्या स्वरूपातील आहे, याबाबत स्पष्ट उल्लेख असावा तसेच अभ्यागत अध्यापक म्हणून करण्यात आलेल्या निवडी संदर्भातील इतर अटी/शर्ती नमूद कराव्यात. अशा अभ्यागत अध्यापकांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या यांचा उल्लेख आदेशामध्ये करण्यात यावा. (अभ्यागत अध्यापक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना देण्यात येणाऱ्या आदेशाचा (प्रपत्र- ड) मधील नमुना सोबत जोडण्यात येत आहे.)

*********

प्रपत्र-ड:

(अभ्यागत अध्यापक उमेदवारांना देण्यात येणाऱ्या आदेशाचा नमुना)

## Institute Letter Head

<u>कार्यालयीन आदेश :</u>

**संदर्भ : विभाग प्रमुख/विभाग नियंत्रक यांची ------- रोजीची टिपण्णी**

उपरोक्त संदर्भीय टिपण्णीनुसार श्री./श्रीमती---------------- यांचा अभ्यागत अध्यापक म्हणुन सन २०__२०__या शैक्षणिक वर्षामधील सम/विषम या सत्राच्या अभ्यासक्रमाच्या दि. ______ ते सत्र समाप्ती पर्यंतच्या कालावधीसाठी या संस्थेत खालील अटीं व शर्तीच्या अधिन राहून सेवा घेण्यात येत आहेत.

I. अभ्यागत अध्यापक म्हणून घेण्यात आलेल्या सेवा निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील आहे.
II. सेवा कालावधी फक्त संबंधित सत्रासाठीचा (Semester) आहे.
III. सदरील सेवा निव्वळ तासिका तत्वावर असल्याने सेवा नियमित करण्याचा हक्क नसून तसा दावा करता येणार नाही.
IV. शैक्षणिक कार्यभाराच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार संस्थेत हजर राहून शैक्षणिक कामकाज पार पाडणे बंधनकारक असेल.
V. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ / विद्यापीठ / स्वायत्त संस्थेतील परिक्षा विभाग यांनी ठरविलेला अभ्यासक्रम शैक्षणिक वेळापत्रकानुसार व त्या संबंधित कामे वेळेत पूर्ण करणे बंधनकारक असेल.
VI. तासिका तत्वावरील सेवेकरीता सैधांतिककरीता प्रति तास रुपये -------- व प्रात्यक्षिक करीता प्रति तास रुपये --------अनुज्ञेय राहिल.
VII. संस्थेतील शासनाच्या मंजूर रिक्त पदावर नियमित नियुक्ती करीता हक्क असणार नाही.
VIII. कामकाज समाधानकारक न आढळल्यास कोणत्याही क्षणी सदरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.
IX. नियमानुसार देय असलेले मानधन देयक, शासनाकडून प्राप्त अनुदान उपलब्धतेनुसार निकाली काढण्यांत येतील.

वरील संबधित अभ्यागत अध्यापक यांनी सन २०__२०___या शैक्षणिक वर्षा मधील सम/विषम सत्राच्या अभ्यासक्रमाचा दिलेला कार्यभार त्यांनी सन २०___२०___या शैक्षणिक वर्षाच्या सम/विषम सत्रातच पूर्ण करावयाचा आहे.

( )
प्राचार्य
संस्थेचे नाव

प्रति,
श्री./श्रीमती......

प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, -----
२. संबधित अभ्यागत अध्यापक यांना विभाग प्रमुख- ___ विभाग यांचे मार्फत.
३. विभाग प्रमुख- _______ विभाग, संस्थेचे नाव
४. लेखा शाखा, संस्थेचे नाव.

प्रपत्र-: इ

(अभ्यागत अध्यापकांनी सादर करावयाच्या हमीपत्राचा नमुना)

पूर्ण नाव व पत्ता -:
मोबाईल नं -:
विभाग -:

## हमीपत्र

संदर्भ- प्राचार्य, शा.तं.नि. ------ / शा.अ.म.----- / शा.औ.नि.म.---
यांचे कार्यालयीन आदेश क्र.

मी (पूर्ण नाव ) .................................................................................................... असे हमीपत्र लिहून देतो /देते कि, संदर्भीय आदेशान्वये, माझ्या .......................... या संस्थेत ...................... विभागाकरीता तासिका तत्वावर सेवा उपलब्ध करुन घेतलेल्या आहेत. माझ्या सेवा या खालील अटी व शर्थींच्या अधिन असून, त्याचे उल्लंघन झाल्यास होणाऱ्या परिणामास मी स्वत: जबाबदार असेन.

१. माझी तासिका तत्वावरील अभ्यागत अध्यापक हि सेवा तात्पुरत्या स्वरुपातील सेवा असून त्यामुळे मला नियमित सेवेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत. यास्तव, "मी भविष्यात सेवेत कायम करण्याची मागणी करणार नाही. तसेच, नियमित सेवेच्या कोणत्याही हक्कांची मागणी करणार नाही".
२. मी वेळापत्रकानुसार अभ्यासक्रमानुसार व इतर आवश्कते प्रमाणे शिकविण्याचे सर्व कार्य विहित वेळेत व दर्जा राखून पूर्ण करेन. या करिता वेळोवेळी विभागप्रमुख / विभाग नियंत्रक यांच्या निर्देशांचे पालन करेन.
३. मी वेळेच्या आत अचूक /त्रुटी रहित देयक सादर करेन. मला मानधन हे शासनाचे अनुदान उपलब्धतेनुसार मिळेल.
४. संबंधित विषयाच्या परिक्षाविषयक सर्व कामे विभागप्रमुख किंवा विभाग नियंत्रक यांच्या निर्देशानुसार पार पाडेन.
५. मी सत्राच्या शेवटी कोर्स फाईल विभागप्रमुख / विभाग नियंकत्रक यांचेकडे जमा करेन.
६. मी मा.प्राचार्य व विभागप्रमुख यांना वेळोवेळी शैक्षणिक कामकाजात त्यांचे सुचनेनुसार मदत करेन.
७. वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांकीत स्वाक्षरी :-
पूर्ण नाव :-

प्रति,
मा. प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय तंत्रनिकेतन,